# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आस्थापना विभाग

## मा.महासभा दि. १६/ १० /2026

## (गोषवारा)

प्रकरण क्र.१०६:- अग्निशमन विभागासाठी मनुष्यबळ पुरवठा करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेबाबत.

अ) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी 100 अग्निशामक ठेका पद्धतीने पुरवठा करणेकरीता जाहीर निविदा सूचना प्रसिध्द करणेबाबत.

ब) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी 50 मजूर ठेका पद्धतीने पुरवठा करणेकरीता फेर जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करणेबाबत

अ) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी ठेका पध्दतीने 100 अग्निशामक पुरवठा करणेकरीता दि.19/01/2024 अन्वये फेर जाहीर निविदा सुचना ई-टेंडरींग संकेतस्थळावर व जाहीर वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने M/s Secure 1 Security Service यांचे दर L1 दर असल्याने मा.प्रशासकीय सभा दि.12/03/2024, ठराव क्र.452 अन्वये मंजूरी देण्यात आलेली असून, दि.14/03/2024 अन्वये 01 वर्षाकरीता 100 अग्निशामक पुरवठा करणेकरीता कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदरची मुदत दि.13/03/2025 रोजी संपुष्टात आलेली आहे. तसेच सदर कामासाठी मा.प्रशासकीय दि.08/04/2025 ठराव क्र.22 अन्वये नविन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत किंवा महानगरपालिकेमार्फत अग्निशामक या पदाकरीता भरती प्रक्रिया सुरु असल्याने भरती प्रक्रियेद्वारे कर्मचारी उपलब्ध होईपर्यंत जे आधी घडेल त्या कालावधीपर्यंत M/s Secure 1 Security Service यांना मुदतवाढ कार्यादेश देण्यात आलेला आहे.

त्यानुसार अग्निशमन विभागात 100 अग्निशामक कामकाजकरीत आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी ठेका पध्दतीने 100 अग्निशामक पुरवठा करणेकरीता 01 वर्षाकरीता जाहीर निविदा सूचना संकेतस्थळावर व जाहीर वृत्तपत्रात प्रसिध्द करणेस व त्याकामी किमान वेतन कायदयानुसार प्रति ठेका कर्मचारी रु.27,436/- इतके आहे. त्यानुसार 100 अग्निशामक (ठेका) पुरवठा करणेकरीता मासिक खर्च रु.27,43,600/- व वार्षिक खर्च रु.3,29,23,200/- (अक्षरी रु. तीन कोटी एकोणतीस लाख तेवीस हजार दोनशे मात्र) इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन 2026-27 या अंदाजपत्रकामधील रु.11 कोटी तरतुद अग्निशमन अस्थायी आस्थापना सुरक्षा रक्षक या लेखाशिर्षकात करण्यात आलेली आहे.

सबब अग्निशमन विभागाने केलेल्या मागणीनुसार व शिफारशीनुसार त्यांना आवश्यक असलेल्या 100 अग्निशामक ठेका पध्दतीने घेणेकरीता व या कामाकरीता 01 वर्षाकरीता रु.3,29,23,200/- (अक्षरी रु. तीन कोटी एकोणतीस लाख तेवीस हजार दोनशे मात्र) इतक्या रक्कमेस मा.महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस व निविदा प्रक्रिया करणेस मंजूरीकरीता सादर.

ब) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात ठेका पध्दतीने 150 मदतनीस (मजुर) पुरवठा करण्याकामी मा.प्रशासकीय सभा दि.02/11/2023 ठराव क्र.247 अन्वये मे.सर्वस्व एन्टरप्रेनर्स या

2

कंपनीला दि.28/06/2022 रोजी व दि.18/08/2022 रोजी 01 वर्षाकरीता ठेका देण्यात आलेला होता. दि.30/06/2023 रोजी मुदत संपुष्टात आल्याने मा.प्रशासकीय सभा दि.02/11/2023 ठराव क्र.247 अन्वये निविदा प्रक्रियेची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मे.सर्वस्व एन्टरप्रेनर्स यांना मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

त्यानुसार अग्निशमन विभागात 50 मजूर कामकाजकरीत आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी मजूर यांचा प्रती कर्मचारी मासिक किमान वेतन रु.25,721/- इतके असून 50 मजूर यांचे मासिक वेतनावरील खर्च रु.12,86,050/- मात्र इतका आहे तसेच 01 वर्षाकरीता रु.1,54,32,600/- असून 02 वर्षाकरीता रु.3,08,65,200/- (अक्षरी रु. तीन कोटी आठ लाख पासष्ट हजार दोनशे मात्र) अंदाजित इतका खर्च अपेक्षित आहे.

सबब अग्निशमन विभागाने केलेल्या मागणीनुसार व शिफारशीनुसार त्यांना आवश्यक असलेल्या 50 मजूर ठेका पध्दतीने घेणेकरीता व या कामाकरीता 02 वर्षाकरीता रु.3,08,65,200/- (अक्षरी रु. तीन कोटी आठ लाख पासष्ट हजार दोनशे मात्र) इतक्या रक्कमेस मा.महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस व निविदा प्रक्रिया करणेस मंजूरीकरीता सादर.

त्यानुसार अग्निशमन विभागासाठी मनष्यबळ पुरवठा करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेबाबत उपरोक्त अ) व ब) करीता मंजूरी मिळणेबाबतचा गोषवारा मा.महासभेपुढे ठेवणेस शिफारस आहे.

(प्रणाली घोंगे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. 98/10 /२०२४ वेळ 2:14.08.40
रजिस्टर नोंद अ. क्र. 60 वर्ष 24-25

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/१०/2026

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक.( १०९ )** मिरा भाईंदर शहरातील पशु-पक्षी व प्राण्यांना होणारे आजार तसेच त्यांच्या आरोग्यविषयक समस्यांचा विचार करुन पशुवैदयकीय रुग्ण्यालय (हॉस्पिटल) उभारण्याबाबत निर्णय घेणे.

मिरा भाईंदर शहराची विकास योजना 16 एप्रिल 2026 रोजी मंजूर झालेली असून सदर विकास योजनेत आरक्षण क्र.308 (ईपी-12) पशुवैदयकीय रूग्णालय व प्राण्यांची दफनभूमी करीता दर्शविण्यात आली आहे. सदर आरक्षणाचे क्षेत्र हे 2083.00 चौ.मीटर असून सदर जागा राज्य / केंद्रशासनाची आहे. सदर जागेवर जिल्हा परिषदेचे पशु उपचार केंद्र आहे.

सदर आरक्षणाची जागा ताब्यात घेणे, तसेच पर्यावरण विभागाच्या दृष्टीने आवश्यक परवानग्या घेण्याची प्रक्रीया सुरु आहे. सदर माहीती मा. महासभेपुढे पुढील निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

PC-6/2026-27/DK/MG-05

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १६/१०/२०२६

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ११० :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ३० अन्वये स्थापन केलेल्या विशेष समितींना निधी व अधिकार देण्याबाबत निर्णय घेणे.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ कलम ३०(१) अन्वये महानगरपालिकेस वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून [महिला व बालकल्याण समितीसह] विशेष समित्यांची नेमणूक करता येईल. अशा समित्यांनी महानगरपालिका त्यांना वेळोवेळी जे अनुदेश देईल ते पाळले पाहिजेत अशी तरतूद आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम ३०(२) अन्वये महानगरपालिकेस, तिच्या सभेत उपस्थित असलेल्या व मत देणाऱ्या पालिका सदस्यापैंकी कमीत कमी दोन तृतीयांश पालिका सदस्यांनी मत देऊन पारित केलेल्या विशिष्ट ठरावाद्वारे प्रत्येक विशेष समितीच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित करता येईल. तसेच आपले अधिकार व कर्तव्ये यापैंकी कोणतेही अधिकार व कर्तव्ये विनिर्दिष्ट केलेल्या विशेष समित्यांकडे प्रत्यायोजित करता येतील अशी तरतूद आहे.

तद्अनुषंगाने मा. महासभा दि. ०६/०५/२०२६, ठराव क्र. ०७ अन्वये विशेष समित्या गठित करुन कामकाजाचे क्षेत्र व अधिकार प्रदान करण्यात आलेले असून, विशेष समित्यांनी केलेले कामकाज, ठराव, शिफारशी इत्यादी सर्व बाबी प्रथमतः मा. स्थायी समिती / मा. महासभेपुढे शिफारस करणेस मान्यता दिलेली आहे.

मा. महासभा ठराव क्र. ७, दि. ०६/०५/२०२६ अन्वये गठित केलेल्या विशेष समित्या पुढीलप्रमाणे :-

१) पाणी पुरवठा व मलनि:सारण समिती

२) शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समिती

३) आरोग्य व वैदयकिय आरोग्य, पर्यावरण, उदयान व शहर सुशोभिकरण समिती

४) समाज कल्याण व झोपडपट्टी सुधार समिती

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम ३०(६) अन्वये, प्रत्येक विशेष समितीचे सर्व कामकाज महानगरपालिकेकडून कायम केले जाण्याच्या अधीन असेल;

परंतु पोट-कलम (२) अन्वये आपले अधिकार व कर्तव्ये यांपैकी कोणतेही अधिकार किंवा कर्तव्ये विशेष समित्यांकडे सोपवताना महानगरपालिकेने अशा समितीचा निर्णय अंतिम असेल असा निदेश दिला असेल तर, अशा समितीच्या कामकाजापैकी असे अधिकार व कर्तव्ये या संबंधीचे कामकाज महानगरपालिकेकडून कायम केले जाण्याच्या अधीन राहणार नाही. मात्र, अशा निर्णयास अशा समितीच्या एकूण सदस्यांपैकी निदान दोन तृतीयांश सदस्यांनी पाठिंबा दिलेला असला पाहिजे अशी तरतूद आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ कलम ३०(६) अन्वये विशेष समितींना अधिकार व कर्तव्ये प्रत्यायोजित करणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. महासभेच्या निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

**(मा. आयुक्त यांचे मान्यतेने.)**

**(दिनेश कैलास कानगुडे)**
**महापालिका सचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**